महाराष्ट्र विधानसभा

चौथे अधिवेशन, २०२२

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

प्रश्नांची एकूण संख्या - ५०

राज्यातील विनाअनुदानीत माध्यामाच्या शाळांना विशेष अनुदान वितरीत करण्याबाबत

(१) ११९२४ (१३-०९-२०२०). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोना महामारीमुळे संपूर्ण देशात व महाराष्ट्रात ग्रामीण तथा शहरी भागात सर्वत्र संचारबंदी असून कोरोना हा संसर्गजन्य रोग असल्यामुळे पहील्या टाळेबंदीपासून महाराष्ट्रातील संपूर्ण शाळा बंद असून या वर्षी परीक्षा सुध्दा घेण्यात आलेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टाळेबंदीमुळे ऐन परिक्षेच्या पुर्वी शाळा बंद झाल्यामुळे व टाळेबंदी व संचारबंदी मध्ये सतत वाढ होत असल्यामुळे तसेच शासनाच्या निर्देशाप्रमाणे विद्यार्थ्याकडून फी न घेतल्यामुळे खाजगी विनाअनुदानीत शाळेचे मोठया प्रमाणात आर्थिक नुकसान होवून त्यांना शाळेचे संचालन करणे आर्थिक दृष्टया कठीण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, टाळेबंदी व संचारबंदी मुळे गरीब मध्यमवर्गीय शहरी तसेच ग्रामीण भागातील लोकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे पुढील शैक्षणिक वर्षात शासनाच्यावतीने या विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देणे बाबत शासनाने काही नियोजन केले आहे काय,

(४) असल्यास, टाळेबंदी नंतर कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शाळेच्या नियमात बदल करुन शासनाने सुचविलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे शाळा सुरु करण्याकरीता अतिरीक्त खर्च सहन करण्याची संस्थाचालकांची त्याअनुषंगाने पालकांची आर्थीक क्षमता नसल्याने या बाबत शासनाकडून कोणती उपाययोजना तयार करण्यात आली वा करण्यात येत आहे तसेच विनाअनुदानीत माध्यामाच्या शाळांना विशेष अनुदान वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. दिपक केसरकर (२४-११-२०२२) :(१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

(३) सदर प्रयोजनासाठी शासन स्तरावरुन अनुदान देण्याची कोणतीही तरतूद नाही.

(४) विना-अनुदानित शाळांना विशेष अनुदान वितरीत करण्यात आलेले नाही.

(५) प्रश्न उदभवत नाही.

अमरावती विभागात नियमबाह्य पदोन्नत्या नियमबाह्य पदोन्नत्या देण्यात आल्याबाबत

(२) १४६४९ (१६-१०-२०२०). श्री.श्रीनिवास वनगा (पालघर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागामधील पुरवठा निरीक्षक संवर्गातून पुरवठा निरीक्षण अधिकारी संवर्गात विभागीय स्तरावर सेवाप्रवेश नियम दिनांक ११ फेब्रुवारी, १९९८ च्या कलम ५ अन्वये दिनांक ३ नोव्हेंबर, २०१८ च्या आदेशान्वये २१ पुरवठा निरीक्षक यांना पदोन्नती देण्यात आली आहे, हे खरे आह काय,

(२) तसेच सन २०१९ च्या विधानसभा सार्वत्रिक निवडणूक आचारसंहितेच्या आधी दिनांक १९ सप्टेंबर, २०१९ च्या आदेशान्वये अमरावती व नागपूर विभागातील ३९ पुरवठा निरीक्षक संवर्गातील कर्मचारी यांना राज्यस्तरावर पुरवठा निरीक्षण अधिकारी संवर्गात विभागीय आयुक्तांचे अधिकार डावलून आर्थिक गैरव्यवहार करून पदोन्नती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एकाच पदाच्या पदोन्नतीसाठी पुरवठा विभागाचे मंत्री बदलल्यावर सामान्य प्रशासन विभागाचे अभिप्राय डावलून दुसऱ्या विभागात राज्यस्तरावर पदोन्नती दिल्याने अन्य विभागातील पुरवठा निरीक्षक यांच्यावर पदोन्नतीबाबत अन्याय झाला आहे , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासन स्तरावर कोकण, नाशिक, पुणे व औरंगाबाद विभागातील पुरवठा निरीक्षकांनी चौकशी करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार नियमबाह्यरित्या पदोन्नती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन सदर पदोन्नत्या रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

श्री. रविंद्र चव्हाण (२४-११-२०२२) :(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही
(४) होय, हे खरे आहे.
(५) प्रश्नाधिन बाबी संदर्भात मा.न्यायालयात प्रकरणे दाखल असून,न्यायप्रविष्ट आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील दहावीच्या विदयार्थ्यांची परिक्षा रदद करण्याबाबत

(३) २७६०० (१४-०६-२०२१). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), ॲड.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अभिमन्यु पवार (औसा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दहावीतील विद्यार्थ्यांच्या परिक्षा रदद करण्याच्या शासनाने निर्णय घेतला असल्याने शाळा स्तरावर मुल्यांकन करुन विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रवेश देण्यात येणार असल्याचे दिनांक २८ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, विद्यार्थ्यींचे मुल्यांकन करुन गुणपत्रिका तयार करण्याचे काम कोणत्या निकषांवर करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, उक्त निर्णय झाला असल्याने काही शाळा महाविद्यालयांनी गुगल फॉर्मच्या माध्यमांतून ११ वी साठी प्रवेश प्रक्रिया सुरु केली असल्याचे माहे जून, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दहावीच्या विद्यार्थ्यांचे योग्य मुल्यांकन करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिपक केसरकर (२४-११-२०२२) : (१) होय.
(२) दि. २८ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे इ. ९ वी व इ. १० वीच्य अंतर्गत मुल्यमापनाच्या आधारे विद्यार्थ्यांचे मुल्यांकन करण्यात आले आहे.
(३) होय.
(४) दि. २८ मे, २०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार विद्यार्थ्यांचे मुल्यांकन करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

शैक्षणिक बोर्डातर्फे आकारल्या जाणाऱ्या पात्रता निकष फी आकारणीबाबत

(४) ३२३५५ (११-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शैक्षणिक वर्ष सन २०२० -२०२१ मधील अकरावीची ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया माहे मार्च, २०२१ अखेर सुरु होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकरावीच्या वर्गाच्या महाराष्ट्र बोर्डाव्यतिरिक्त सी.बी.एस.ई. बोर्ड तसेच आय.सी.एस.ई.बोर्ड अंतर्गत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनीकडून शैक्षणिक बोर्डातर्फे पात्रता निकषाकरिता एलीजीबिलीटी फी आकारली जाते, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सध्या कोविड–१९ च्या प्रादुर्भावामुळे पालकांची आर्थिक परिस्थिती बिकट असूनही शैक्षणिक बोर्डातर्फे आकारली जाणारी एलीजीबिलीटी फी वेळेत न भरलेल्या पालकांकडून लेट फी आकारली जात असल्याचे निदर्शनास येत आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, कोविड -१९ च्या प्रादुर्भावामुळे असणाऱ्या लॉकडाऊनच्या धर्तीवर दिनांक ३० जून, २०२१ पर्यंत इयत्ता अकरावी च्या विद्यार्थिनीकडून पात्रता निकषासाठी लेट फी न घेता नियमित फी आकारण्याबाबत स्थनिक, लोकप्रतिनिधी यांनी माहे जून, २०२१ च्या पहिल्या आठवड्यात विभागीय सचिव,पुणे विभागीय मंडळ यांच्याकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिपक केसरकर (२४-११-२०२२) : (१) होय.
(२) होय.
(३) राज्य मंडळाच्या मंडळ नियमावली विनियम १९७७ नुसार अन्य मंडळाच्या विद्यार्थ्यांकरीता योग्यता प्रमाणपत्रासाठी एलीजीबिलीटी फी आकारण्यात येते. तथापि, कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या असमान्य परिस्थितीमुळे सदर योग्यता प्रमाणपत्रासाठी नियमित / विलंब शुल्कासह अर्ज सादर करण्यासाठी तीन महिने मुदतवाढ देण्यात आली होती.
(४) होय.
(५) योग्यता प्रमाणपत्राबाबत मंडळाकडून उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात आली असून याबाबत संबंधित लोकप्रतिनिधी यांना पुणे विभागीय मंडळाकडून दि.०२.०७.२०२१ रोजीच्या पत्रान्वये वस्तुस्थिती अवगत करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागात नियमबाह्य पध्दतीने पदोन्नती देण्यात आल्याबाबत

(५) ३२३७७ (११-०८-२०२१). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातील पुरवठा निरीक्षण अधिकारी व सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी यांची राज्य स्तरावर सेवा जेष्ठता यादी तयार करण्यात आली असून या यादीतील ३९ पुरवठा निरीक्षकांना

निरीक्षण अधिकारी म्हणून नियमबाह्य पदोन्नती देण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुरवठा निरीक्षक संवर्गातून निरीक्षण अधिकारी व सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी ही पदे राज्य स्तरावर न भरता सेवा प्रवेश नियमाप्रमाणे विभागीय स्तरावर पदोन्नतीने भरण्यात यावी अशी मागणी पुरवठा कर्मचारी संघटनेने शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुरवठा निरीक्षण अधिकारी व सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या सेवा प्रवेश नियमात कोणतेही बदल न करता पूर्वीप्रमाणेच विभाग स्तरावर पदोन्नती देणेबाबत चिंचवड विधानसभेचे लोकप्रतिनिधी यांनी मा.अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री व सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडे माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (२४-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे आहे.
(४) व (५) प्रश्नाधिन बाबी संदर्भात मा.न्यायालयात प्रकरणे दाखल असून,न्यायप्रविष्ट आहेत.

राज्यात दहावी व बारावीच्या परिक्षा कोरोना काळात रदद झाल्यामुळे विद्यार्थ्यांना परिक्षांसाठी आकारलेले शुल्क परत करण्याबाबत

(६) ३२७२७ (१२-०१-२०२२). श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनामुळे महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या १० वी ची परीक्षा रद्द करण्यात आली ही खरे आहे काय,
(२) असल्यास, परीक्षा शुल्क म्हणून घेण्यात येणारे शुल्क विद्यार्थ्यांना परत करण्यात येणार आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास.विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिपक केसरकर (२४-११-२०२२) :(१) होय.
(२), (३) व (४) मा.उच्च न्यायालयाच्या आदेशांच्या अनुषंगाने अध्यक्ष, राज्यमंडळ यांनी घेतलेल्या निर्णयानुसार फेब्रुवारी-मार्च २०२१ च्या परीक्षेसाठी नोंदणी झालेल्या इ.१० वी व इ.१२ वी च्या एकूण विद्यार्थ्यांपैकी पात्र विद्यार्थ्यांना शाळांनी नोंदविलेल्या मागणीनुसार शुल्काचा परतावा मंडळाकडून करण्यात येत आहे. दिनांक १३.०६.२०२२ अखेर मागणी नोंदविलेल्या सर्व पात्र विद्यार्थ्यांची रु.१२.१८ कोटी इतक्या रकमेचा संबंधित शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांना परतावा करण्यात आला आहे. उर्वरित विद्यार्थ्यांना शाळांच्या मागणीनुसार परतावा करण्याची कार्यवाही मंडळामार्फत करण्यात येत आहे.

राज्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरीत करण्याबाबत

(७) ३३५०२ (१२-०१-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विद्यार्थ्यांच्या विविध विभागाच्या वतीने देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्या तसेच शैक्षणिक शुल्काबाबत

तांत्रिक अडचणी दूर करुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरीत करण्यात यावी असे आदेश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांनी मंत्रालयात घेतलेल्या आढावा बैठकीत दिले असल्याचे माहे सप्टेंबर,२०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बैठकीसाठी उच्च तंत्र शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवासह माहिती तंत्रज्ञान विभाग, आदिवासी विभाग, सामाजिक न्याय विभाग, बहुजन कल्याण विभाग यांचे सर्व सबंधित सचिव व अधिकारी उपस्थित होते तसेच गत दोन वर्षापासून जी शिष्यवृत्ती प्रलंबित आहे, ती तातडीने वितरीत करण्यात यावी अशा सुचनाही देण्यात आल्या आहेत हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात सर्व योजना ऑनलाईन पध्दतीने सुरु आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी-शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२२-११-२०२२) :(१), (२) व (३) होय.

(४) उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अधिनस्त राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना, डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाहभत्ता योजना हया डीबीटी पोर्टलव्दारे ऑनलाईनरित्या राबविण्यात येतात.

उपरोक्त शिष्यवृत्ती योजनांचा आढावा घेण्यासाठी दि.०२/०९/२०२१ रोजी मा.मंत्री महोदय, उच्च व तंत्रशिक्षण यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत सर्व संबंधित विभागांकडे मागील दोन वर्षापासून प्रलंबित असलेल्या शिष्यवृत्त्यांची तरतूद तातडीने वितरीत करण्याबाबत मा.मंत्री महोदयांनी निर्देश दिले होते.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या अधिनस्त राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेतंर्गत सन २०२१-२२ करीता रु. ६२२.०० कोटी मंजूर करण्यात आले होते. तद्नंतर सन २०१९-२० व २०२०-२१ मधील विद्यार्थ्यांची प्रलंबित शिष्यवृत्ती भागविण्यासाठी दि.२९.०३.२०२२ च्या शासन निर्णयान्वये रु.७७३.६९ कोटी तरतूद मंजूर करण्यात येवून सदरचा संपूर्ण निधी हा मार्च, २०२२ अखेर वितरित करण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी व बारावीच्या परिक्षेच्या महत्वाच्या विषयांच्या यादीतून मराठीसह देशातील सर्व भाषा वगळल्याबाबत

(८) ३४०९७ (१७-०१-२०२२). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी व बारावीच्या परिक्षेच्या महत्वाच्या विषयांच्या यादीतून मराठीसह देशातील सर्व भाषा वगळल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिपक केसरकर (२४-११-२०२२) : (१) व (२) केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम तयार करणे, प्रशिक्षण आयोजित करणे, विषय योजना निश्चित करणे व तद्नुषंगिक बाबी संबंधित मंडळा मार्फत केल्या जातात.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ दिनांक ९ मार्च,२०२० च्या राजपत्रामध्ये महाराष्ट्र राज्यातील सर्व शाळांमध्ये मराठी भाषेचे अध्यापन व अध्ययन सक्तीचे करण्यासाठी आणि यासंबंधित किंवा तद्नुषंगिक बाबीसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम प्रसिध्द केला आहे. याबाबतची अंमलबजावणी सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

नाशिक जिल्हा हा कृषि उद्योग जिल्हा म्हणून जाहीर करणेबाबत

(९) ३५०४८ (१२-०१-२०२२). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हा कृषि उत्पादनासाठी ओळखला जात असून द्राक्ष, कांदा, डाळिंब तसेच गुलाब, स्ट्रॉबेरी यासह भाजीपाल्याचे या पिकांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जात असल्याने नाशिक जिल्हा कृषि उद्योग जिल्हा म्हणून जाहीर करण्याची मागणी स्थानिक लोकप्रनिनिधी यांनी माहे फेब्रुवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केद्र शासनाने आखलेल्या कृषि व औद्योगिक विकास धोरणाचा विचार करता नाशिक जिल्हा हा कृषि क्षेत्रात अग्रेसर असल्याने त्यास कृषि उद्योग जिल्हा म्हणून जाहीर करण्याचे शासनच्या विचाराधीन आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन नाशिक जिल्हा कृषि उदयोग जिल्हा जाहीर करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (२८-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.

नाशिक जिल्हयात मोठया प्रमाणात उत्पादीत होणारे फळे, फुले, पिके इ. विशेष उत्पादने विचारात घेवून, ज्याप्रमाणे सिंधुदुर्ग जिल्हयाला शासनाने पर्यटन जिल्हा म्हणून घोषित केले आहे त्याच धर्तीवर नाशिक जिल्हयाला कृषि उद्योग जिल्हा म्हणून घोषित करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी त्यांच्या दिनांक १८/०२/२०२० च्या निवेदनाव्दारे शासनास केली आहे.

(२) व (३) नाशिक जिल्हा हा कृषि प्रधान जिल्हा असून, या जिल्हयात एकूण १५,५४५ लघु, मध्यम व मोठे उद्योग कार्यरत आहेत. त्यापैकी ३,०२८ उद्योग हे कृषि प्रक्रिया उद्योग असून त्यात एकूण २२,७९५ एवढी रोजगार निर्मीती झाली आहे व एकूण गुंतवणूक रु.१५२८ कोटी एवढी आहे. याशिवाय कृषि पूरक उत्पादने म्हणून कृषि अवजारे, पाईप, पंप सेट, इलेक्ट्रीक मोटर, खते, बी-बियाणे आणि पॅकेजींग क्षेत्रात १६१५ उद्योग घटक कार्यरत असून त्यात ११,५१२ एवढी रोजगार निर्मीती झाली आहे. यामध्ये अंदाजे रु. १०००/- एवढी गुंतवणूक झाली आहे. तसेच वाहतूक कोल्ड स्टोरेज, मार्केटिंग अशा क्षेत्रात प्रत्यक्ष गुंतवणुक ही मोठया प्रमाणात असून त्यातही १० हजार पेक्षा रोजगार निर्मीती होते. जिल्हयातील एकूण औद्योगिक क्षेत्रात ३० टक्के उद्योग हे कृषि प्रक्रिया आणि कृषि पूरक क्षेत्रात आहेत.

राज्य शासनाव्दारे औद्योगिक धोरण-२०१९ दि.०७/०३/२०१९ रोजी घोषित केले आहे. व त्याअनुषंगाने सामूहिक प्रोत्साहन योजना -२०१९ ही दिनांक १६/०९/२०१९ रोजी घोषित केली आहे. सदर धोरणान्वये कृषी उत्पादनावर आधारीत उद्योगांना शासनाने खालीलप्रमाणे सवलती व अधिकची प्रोत्साहने अनुज्ञेय केली आहेत.

(१) सामूहिक प्रोत्साहन योजना-२०१९ मध्ये कृषि व अन्न प्रक्रिया उद्योगांना इतर उद्योग घटकांना देय असलेल्या प्रोत्साहनांपेक्षा २० टक्के अधिकची आर्थिक प्रोत्साहने तसेच २ वर्ष अतिरिक्त प्रोत्साहन कालावधी अनुज्ञेय करण्यात आला आहे.

(२) तसेच दिनांक ३१/०८/२०२० च्या शासन निर्णयान्वये कृषीवर आधारीत अन्न प्रक्रिया उद्योगांना साप्रोयो-२०१९ अंतर्गतचे मोठे व विशाल प्रकल्पासाठी विहीत गुंतवणुकीचे रोजगाराचे निकष व प्रोत्साहने सुधारीत केली असून या शासन निर्णयानुसार मोठया उद्योग घटकांकरिता, घटक ज्या ठिकाणी स्थापित होणार आहे. त्या ठिकाणच्या क्षेत्र वर्गीकरणानुसार ५० ते २५० कोटी पर्यंत गुंतवणुकीचा निकष आहे.

(३) त्याचबरोबर राज्याच्या क्षेत्र वर्गीकरणानुसार रु.१०० कोटीपेक्षा अधिक गुंतवणूक अथवा २०० रोजगार निर्मीती ते रु. २५० कोटी पेक्षा अधिक गुंतवणूक अथवा ५०० रोजगार निर्मीती करणाऱ्या कृषिवर आधारीत व अन्न प्रक्रिया उद्योगांना विशाल प्रकल्पाचा दर्जा अनुज्ञेय करण्यात आला आहे.

(४) पात्र उद्योगासाठी राज्याच्या क्षेत्र वर्गीकरणानुसार स्थिर भांडवली गुंतवणूकीच्या ५० % ते ११० % प्रोत्साहने अनुज्ञेय करण्यात आली असून प्रोत्साहने उपभोगण्याचा कालावधी १० वर्ष इतका आहे.

वरील वस्तुस्थिती विचारात घेता, कृषि उत्पन्नावर आधारीत उद्योगांना शासनाने इतर उद्योगांपेक्षा जास्तीच्या सोयी सवलती व प्रोत्साहने अनुज्ञेय केली आहेत. सदर धोरणाचा/ योजनांचा कालावधी हा सन २०१९ ते सन २०२४ असा एकूण पाच वर्षाचा आहे. सदर अतिरिक्त सवलती व प्रोत्साहनांचा लाभ नाशिक जिल्हयासह राज्यातील सर्व क्षेत्रातील शेतकऱ्यांना व कृषि उत्पादन आधारीत उद्योगांना होत असल्याने, सद्य:स्थितीत नाशिक जिल्हा कृषि उद्योग जिल्हा जाहीर करण्याची आवश्यकता दिसून येत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील गाईड (मार्गदर्शक) यांची पदे रिक्त असल्याबाबत

(१०) ३६३४७ (१२-०१-२०२२). श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दिनांक ३१ ऑक्टोबर २०२१ रोजी निर्गमित केलेल्या कार्यालयीन परिपत्रकाद्वारे पी.एच.डी (Phd) करिता प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुणे विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार गाईडच्या राखीव जागा पूर्ण भरल्याशिवाय पी.एच.डी (Phd) प्रवेश प्रक्रिया पूर्ण होणार नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१७-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
विद्यापीठामार्फत पीएच. डी. प्रवेशासाठी विहित प्रक्रियेनुसार करावयाच्या कार्यवाहीमध्ये काही बदल प्रस्तावित असल्यामुळे, वेळापत्रक पुढे ढकलण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.
प्रचलित कार्यपध्दतीनुसार सर्व मागास प्रवर्गासाठी जागा उपलब्ध होत नसल्याने विद्यापीठ विभाग/ संशोधन केंद्र येथे असलेल्या मार्गदर्शकांकडील मंजूर प्रवेशक्षमता एकत्रित विचारात घेऊन आरक्षण निश्चित करुन प्रवेशाची पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील आरटीईअंतर्गत रिक्त पदे भरण्याबाबत

(११) ३७६९५ (३१-०३-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील मुंबई, ठाणे, पालघर, रायगड येथील शिक्षण हक्क कायद्या अंतर्गत (आरटीई) प्रवेशात ९ हजार ४३२ शाळांमध्ये ऑगस्ट ते माहे डिसेंबर, २०२१ पर्यंत पात्र विद्यार्थ्यांचे प्रवेश प्रक्रीया सुरू करून ९६ हजार ६८४ जागांसाठी राज्यभरातून सुमारे २ लाख २२ हजार ५८४ विद्यार्थ्यांचे अर्ज शालेय शिक्षण विभागाकडे प्राप्त झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रवेशापैकी सुमारे १ लाख २ हजार ९६९ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित करण्यात आले होते त्यापैकी ७१ हजार ७१७ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रवेश घेतला हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यभरातील २४ हजार ९६८ जागा अजुनही रिक्त असून त्यापैकी मुंबई विभागात सर्वाधिक १३ हजार २७७ जागा रिक्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, प्रतीक्षा यादीतील रिक्त जागा भरण्यात येणार आहे काय तसेच खाजगी शाळांतील २५ टक्के राखीव जागावरील प्रवेश प्रक्रिया सुरु ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिपक केसरकर (२२-११-२०२२) :(१) अंशतः खरे आहे.
सदरहू अर्ज आरटीई पोर्टलवर प्राप्त झाले होते.
(२) व (३) अंशतः खरे आहे.
(४) व (५) सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षासाठी आरटीई २५% प्रवेशाबाबतची कार्यवाही पूर्ण झाली असल्याने प्रश्न उद्भवत नाही.

केंद्रीय बोर्डाच्या शाळांमध्ये मराठी भाषा विषय शिकविण्याकडे होत असलेले दुर्लक्ष

(१२) ३८५५४ (०९-०४-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्व शाळांमध्ये मराठीचे शिक्षण सक्तीचे व्हावे या उद्देशाने शासनाने मराठी भाषेचे सक्तीचे अध्यापन व अध्ययन अधिनियम २०२० हा कायदा संमत केला असतानाही सन २०२०-२१ या वर्षापासून प्राथमिक शाळांमध्ये सहावीपासून मराठी भाषा विषय शिकविणे बंधनकारक करण्यात आले असतानाही आणि त्यानंतर टप्प्याटप्प्याने पुढील प्रत्येक वर्षामध्ये मराठी भाषा विषयाचे वर्ग सुरु करण्याचे निर्देश शासनाने सर्व शाळा व्यवस्थापनांना देण्यात येऊनही यावर शाळा व्यवस्थापनाने कोणतीच कार्यवाही न करता याकडे दुर्लक्ष केल्याची बाब निदर्शनास आली हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महाराष्ट्र राज्यात मराठी विषय न शिकविणाऱ्या सर्व बोर्डाच्या शाळांना यापुढे एक लाख रुपये दंड ठोठावण्याबाबत प्राथमिक शिक्षण संचालनालयाने सर्व विभागीय शिक्षण उपसंचालकांना निर्देश देण्यात येऊनही अद्याप त्याची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे आढळून आले हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, सदरहू शासन अधिनियमाचे उल्लंघन करुन मराठी भाषा विषय न शिकविणाऱ्या किती व कोणत्या केंद्रीय बोर्डाच्या शाळांमध्ये शाळा व्यवस्थापनामध्ये शासनातर्फे दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिपक केसरकर (२४-११-२०२२) : (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

आरटीई प्रवेशासाठी केवळ राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक ग्राह्य धरण्यात येणार असल्याबाबत

(१३) ३८९५२ (०९-०४-२०२२). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आरटीई प्रवेशासाठी यापूर्वी निवासी पुरावा म्हणून शिधापत्रिका, वाहन चालविण्याचा परवाना, वीज, दुरध्वनी देयक, मिळकत देयक, गॅसबुक, आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, पारपत्र, बँक खाते पुस्तक, इतर स्थानिक बँकेचे खाते पुस्तक आणि ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी नोंदणीकृत असलेला भाडेकरार यापैकी कोणताही एक पुरावा कागदपत्र ग्राह्य धरले जात होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्राथमिक शिक्षण संचालनालयातर्फे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी आरटीई प्रवेशाचे संभाव्य वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे,हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकात प्रश्न भाग-१ मधील पुराव्याऐवजी केवळ राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक ग्राह्य धरण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

वि.स. १२३ (9)

श्री. दिपक केसरकर (२२-११-२०२२) : (१) व (२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

समग्र शिक्षा अभियांनाअंतर्गत गरीब विद्यार्थ्यांना मोफत गणवेश देण्याबाबत

(१४) ४०००४ (०९-०४-२०२२). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील विशेषत: गंगाखेड, हिंगोली जिल्ह्यातील शिरड शहापूर येथील समग्र शिक्षा अभियांनाअंतर्गत गोरगरीब विद्यार्थ्यांना मोफत गणवेश दिला जात असून गणवेशासाठी लागणारी रक्कम विद्यार्थ्यांना मिळाली नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,शासनाने शालेय गणवेश योजनेमध्ये विद्यार्थ्यांना प्रत्येकी एका गणवेशासाठी ३०० रुपये याप्रमाणे १०८ कोटी रुपयांचा निधी मंजूर केलेला असताना ३६ लाख विद्यार्थ्यांना एकच गणवेश देण्यात आला आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गणवेश परभणी जिल्हयातील नांदेड येथील एकाच संस्थेकडून खरेदी करण्यात यावी यासाठी मुख्याध्यापक यांना तोंडी आदेश देण्यात आले होते हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, गणवेश अनुदानात वाढ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिपक केसरकर (२२-११-२०२२) : (१) अशंत: खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) समग्र शिक्षांतर्गत मोफत गणवेश योजना ही केंद्र शासनाचा उपक्रम असल्याने केंद्र शासनाचे निकषानुसार प्रती लाभार्थी प्रती संच ३०० रुपये या दराने दोन गणवेश संचाकरिता रु.६०० इतकी तरतूद मंजूर केली जाते
(५) प्रश्न उद्भवत नाही.

हिंगोली जिल्हयात मजुरांच्या पाल्यांसाठी हंगामी वसतीगृह सुरु करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत

(१५) ४०१९१ (०९-०४-२०२२). श्री.माधवराव पवार (हदगाव) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील स्थलांतरीत मजुरांच्या पाल्यांना शिक्षणाच्या प्रवाहात राहता यावे यासाठी त्यांच्या निवासासह भोजनाची व्यवस्था हंगामी वसतीगृहाद्वारे केली जात होती, मात्र महाराष्ट्र शिक्षण परिषदेकडे पाठविण्यात आलेल्या आराखडयात यासाठी निधीची मागणी न केल्याने हिंगोली जिल्हयात एकही हंगामी वसतीगृह सुरु होणार नसल्याची बाब माहे जानेवारी, २०२२ वा त्या सुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हिंगोली जिल्हापरिषद सदस्यांकडून हंगामी वसतीगृह उभारण्याची आग्रही मागणी असतानाही शिक्षण अधिकाऱ्यांनी आराखडयात तरतूद केली नसल्याने अशी वसतीगृह स्थापन करणे शक्य नसल्याचे स्पष्ट केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, हिंगोली जिल्हयातील मजूरांचा विचार करता हंगामी वसतीगृह सुरु करण्यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिपक केसरकर (२४-११-२०२२) : (१), (२) व (३) हे खरे आहे.
एक गाव एक बालरक्षक या संकल्पनेची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे.
हिंगोली जिल्ह्यामध्ये एक गाव एक बालरक्षक ही चळवळ शाळाबाह्य, स्थलांतरीतांच्या पाल्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याकरिता व स्थलांतरण रोखण्यासाठी अतिशय प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. माहे फेब्रूवारी,२०२२ मध्ये स्थलांतरीतांच्या पाल्यांची माहिती घेतली असता बालरक्षकांच्या मदतीने स्थलांतरण रोखण्यात यंत्रणेस यश प्राप्त झाले आहे. त्यामुळे गटशिक्षणाधिकारी यांनी सन २०२१-२२ मध्ये हंगामी वसतीगृहाची आवश्यकता नसल्याचे कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील तरुण उद्योजकांसाठी इंक्युबेशन सेंटर उभारण्यासाठी
शैक्षणिक संस्थांच्या इमारतींचा वापर करण्याबाबत

(१६) ४१५६२ (०९-०४-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात बंद पडलेले इंजिनीअरिंग कॉलेज व इतर व्यावसायिक शिक्षण संस्थाची आकडेवारी राज्य शासनाकडे आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील तरुण उद्योजकांसाठी इंक्युबेशन सेंटर उभारण्यासाठी तसेच कौशल्य विकास योजना राबविण्यासाठी बंद पडलेल्या शैक्षणिक संस्थांच्या इमारतींचा वापर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२२-११-२०२२) : (१) अंशत: खरे आहे.
- राज्यात अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, वास्तुशास्त्र, एमबीए व एमसीए या व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शासकीय व शासन अनुदानित महाविद्यालय बंद पडलेले नाही.
तथापि, अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद / वास्तुकला परिषद / फार्मसी कौंसिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली या शिखर परिषदांच्या मान्यतेनुसार कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु असलेल्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था बंद करण्यास संबंधित व्यवस्थापन मंडळाच्या ठरावास अनुसरुन शिखर परिषदांनी मान्यता दिलेली असून अशा संस्थांची यादी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या स्तरावर उपलब्ध आहे.
(२) हे खरे नाही.
तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील खाजगी कायम विनाअनुदानित तत्वावर सुरु करण्यास मान्यता देण्यात येणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक संस्थांना शासनाद्वारे आवर्ती व अनावर्ती अनुदान देण्यात येत नाही. तसेच बंद केलेल्या संस्थांची जमिन, इमारत, यंत्रसामुग्री, चल व अचल मालमत्ता इ. ट्रस्टच्या मालकीची असून अशा संस्था बंद करण्याचा निर्णय संस्थाचालकांमार्फत स्वेच्छेने घेण्यात येतो. सदर शैक्षणिक संस्थांमध्ये इंक्युबेशन सेंटरची उभारणी करण्याचे शासनाचे धोरण नाही.
(३) लागू नाही.

राज्यातील छोटया शहरात आयटी केंद्र उभारण्याबाबत

(१७) ४३००५ (३०-०३-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नोडल आयटी केंद्र सुरु करण्याची शासनाची योजना असल्याचे दिनांक ८ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त केंद्राच्या माध्यमातून आयटी कर्मचारी त्यांच्या कंपन्यासाठी काम करु शकतील, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील योजनेची नांदड येथे कधी अंमलबजावणी करण्यात येणार आहे ,याप्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (०१-१२-२०२२) : (१) व(२) राज्यात नोडल आयटी केंद्र सुरु करण्याची उद्योग विभागाची कोणतीही योजना नाही. महाराष्ट्राचे माहिति तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०१५ दिनांक २५/०८/२०१५ रोजी जाहीर करण्यात आले आहे. सदर धोरणांतर्गत खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्याने विकासकामार्फत उभारण्यात येतात. विकासकांनी उभारलेल्या खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानांमार्फत माहिती तंत्रज्ञान उद्योग घटकांना बांधीव जागा, अखंडित वीजपुरवठा, इंटरनेट कनेक्टीव्हीटी यांसारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यात येतात.
(३) राज्याचे पहिले माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण सन १९९८ मध्ये जाहीर करण्यात आले आहे. त्यानंतर माहिती तंत्रज्ञान आणि माहिती तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२००३, २००९ व २०१५ अशी धोरणे जाहीर करण्यात आली आहेत. जिल्हयातील विकासकाने खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यान उभारण्याचा परिपूर्ण प्रस्ताव उद्योग संचालनालयास सादर केल्यास उभारणीसाठी आवश्यक असणाऱ्या मंजूरी / ना-हरकत प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येतात. त्याप्रमाणे नांदेड जिल्हयातील विकासकाने खाजगी माहिती तंत्रज्ञान उभारण्याचा परिपूर्ण प्रस्ताव सादर केल्यास उद्योग संचालनालयाकडून पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

वरोरा (जि.चंद्रपूर) येथील उद्योगांमध्ये स्थानिकांना रोजगार देण्याबाबत

(१८) ४३७८४ (०७-०४-२०२२). श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरोरा (जि.चंद्रपूर) येथील उद्योगांमध्ये स्थानिकांना रोजगार देत नसल्याचे माहे फेब्रुवारी,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जिल्ह्यातील उद्योगांमध्ये रोजगारासाठी ८० टक्के स्थानिकांना प्राधान्य देण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात चौकशी करुन येथील उद्योगांमध्ये स्थानिकांना रोजगार मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (२८-११-२०२२) : (१) हे खरे नाही. स्थानिकांना उद्योगांमध्ये ८०% प्राधान्य देण्याबाबतच्या शासनाच्या धोरणानुसार चंद्रपूर जिल्हयातील मोठे व विशाल उपक्रमांमध्ये स्थानिकांची ९१.१४% व सुक्ष्म ,लघु व मध्यम उद्योगांमध्ये स्थानिकांची ९१.९५% संख्या असल्याचे दिसून आले आहे.
(२) प्रश्न उदभवत नाही.
(३) प्रश्न उदभवत नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

राज्यातील पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या संशोधन केंद्रांनी पीएचडी व एमफिल अभ्यासक्रमासाठी अतिरिक्त शुल्क आकारल्याबाबत

(१९) ४४५०२ (०२-०५-२०२२). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पुणे विद्यापीठाने पीएचडी व एमफिल अभ्यासक्रमासाठीचे शुल्क निश्चित केल्याची माहिती माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये वा त्या दरम्यान संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे विद्यापीठाशी संलग्न काही संशोधन केंद्रांनी निर्धारित विहित केलेल्या शुल्क रचनेपेक्षा जादा शुल्क आकारण्यात येत असल्याच्या तक्रारी विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाकडे विद्यार्थी संघटनांमार्फत प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे विद्यापीठाने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा विद्यार्थ्यांकडून अतिरिक्त शुल्क आकारण्यात येत असलेल्या मान्यताप्राप्त पीएचडी व एमफील संशोधन केंद्रांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, जादा शुल्क आकारणी केलेल्या विद्यार्थ्यांना शुल्काचा परतावा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०२-१२-२०२२) :(१) हे खरे आहे,

पीएच.डी. व एम. फिल अभ्यासक्रमासाठीचे शुल्क विद्यापीठ परिपत्रक क्र. पीजीएस/७७/, दि.२६.०२.२०१६ अन्वये निश्चित करण्यात आले आहे.

(२) हे खरे आहे,

पालक, विद्यार्थी व इतर माध्यमांद्वारे तोंडी तसेच लेखी स्वरुपात विशिष्ट संशोधन संस्थेचा उल्लेख न करता अशा तक्रारी विद्यापीठाकडे प्राप्त झालेल्या आहेत.

(३) व (४) विहित केलेल्या शुल्क रचनेपेक्षा अधिक शुल्क आकारल्यास संबंधित संस्थेचे संशोधन केंद्र बंद करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने परिपत्रक क्र.पीजीएस/३११, दि.१२.११.२०२१ अन्वये कळविले आहे.

तरी, शुल्क आकारल्याबाबतची ठोस माहिती प्राप्त झाल्यास विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार विद्यापीठाकडून कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील नागरीकांना अन्न असुरक्षिततेला सामोरे जावे लागू नये याकरीता शासनाने करावयाच्या उपाययोजनांबाबत

(२०) ४४८१६ (१६-०९-२०२२). श्री.सुनील राणे (बोरीवली) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरोनापूर्व काळाच्या तुलनेत सध्या ६४ टक्के नागरिकांचे उत्पन्न निम्म्याने घटले असून ७८ टक्के कुटुंबांना अन्न असुरक्षिततेला सामोरे जावे लागत असल्याचे भीषण वास्तव अन्न अधिकारी अभियान, महाराष्ट्र यांनी माहे डिसेंबर, २०२१ ते जानेवारी, २०२२ या कालावधीत केलेल्या भूक सर्वेक्षणातून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मनरेगा योजनेंतर्गत ४६ टक्के नागरिकांना कोणतेही काम मिळाले नसणे तसेच २१ टक्के नागरीकांना मजुरी वेळेवर मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या काळात शासनाच्या मध्यान्ह भोजन योजना बंद अवस्थेत असून एकात्मिक बाल विकास योजनेतील सन २०२१-२२ च्या तुलनेत २०२२-२३ मध्ये आर्थिक तरतूद देखील कमी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याची कारणे काय आहेत तसेच राज्यातील नागरीकांना अन्न असुरक्षिततेला सामोरे जावे लागू नये याकरीता शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे?

श्री. रविंद्र चव्हाण (२५-११-२०२२) : (१) अन्न अधिकारी अभियान, महाराष्ट्र यांनी केलेल्या कोणत्याही सर्वेक्षणाचा अहवाल या विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(२) हे खरे नाही. डिसेंबर, २०२१ मध्ये ५,०६,६७९ कुटुंबांना ८३,१९,३५३ मनुष्य दिन रोजगार उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. तसेच, जानेवारी २०२२ मध्ये ६,०३,५७२ कुटुंबांना १०३,९३,९६५ मनुष्य दिन रोजगार उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात हजेरी पत्रक निर्गमित झाल्यापासून ८ दिवसाच्या आत मजुरी अदा करण्याचे प्रमाण ८३.८१% तर १५ दिवसाच्या आत मजुरी अदा करण्याचे प्रमाण ९५.८२% आहे.

(३) कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शाळा बंद असलेल्या कालावधीत विद्यार्थ्यांना कोरडा शिधा स्वरूपात पोषण आहाराचा लाभ देण्याबाबत केंद्र शासनाने दि. ३१ जुलै,२०२० च्या पत्रान्वये राज्यांना निर्देश दिले होते. त्यानुसार माहे जून,२०२० ते फेब्रुवारी,२०२२ या कालावधीत विद्यार्थ्यांना प्रति विद्यार्थी प्रति दिन आहार खर्च मर्यादेमध्ये तांदूळ व धान्यादी माल याप्रमाणे कोरडा शिधा स्वरूपात शालेय पोषण आहार योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना देण्यात आला आहे. तद्नंतर, माहे फेब्रुवारी,२०२२ पासून राज्यातील शाळांमध्ये शिजविलेल्या आहाराच्या स्वरूपात शालेय पोषण आहार योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही करण्यात येत असून राज्यात शालेय पोषण आहार योजना अखंडितपणे सुरू आहे.

पूरक पोषण आहाराकरीता केंद्र व राज्य हिस्सा (५०:५०) करीता सन २०२१-२२ व सन २०२२-२३ मधील एकूण तरतूदीची माहिती खालीलप्रमाणे:

वर्ष अर्थसंकल्पित तरतूद पूरक मागणीद्वारे प्राप्त तरतूद एकूण तरतूद
२०२१-२२ १४८२.३८ ५५० २०३२.३८
२०२२-२३ १५४९.८० * *

सन २०२१-२२ पेक्षा सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पित तरतूद जास्त करण्यात आलेली आहे.

तसेच, २०२१-२२ या आर्थिक वर्षात रू. ५५० कोटी पुरक मागणीद्वारे प्राप्त झाले होते. त्यापेक्षा अधिक रकमेचा म्हणजेच रू. ७०७.९३ कोटी एवढ्या रकमेचा पुरक मागणीचा प्रस्ताव २०२२-२३ मध्ये सादर करण्यात आलेला आहे.

(४) राज्यात दि. १ फेब्रुवारी, २०१४ पासून राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ ची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्यानुसार ७००.१७ लक्ष नागरिकांना नियमितपणे अनुदानित दराने अन्नधान्याचा लाभ देण्यात येत असून त्यानुषंगाने दि. १८.२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये जिल्हानिहाय सुधारित इष्टांक निर्गमित करण्यात आला आहे. तसेच, कोविड-१९ प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेची अंमलबजावणी राज्यात करण्यात येत आहे. सदर योजनेच्या सातव्या टप्प्याची अंमलबजावणी माहे ऑक्टोबर, २०२२ ते डिसेंबर, २०२२ या कालावधीत करण्यात येत आहे.

दि. १८ मे, २०२२ च्या शासन पत्रान्वये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ माहे मार्च, २०२३ पर्यंत जिल्हानिहाय नियतन देण्यात आले आहे. तसेच, दि. ३० सप्टेंबर, २०२२ च्या शासन पत्रान्वये माहे ऑक्टोबर, २०२२ ते डिसेंबर, २०२२ या कालावधीकरिता जिल्हानिहाय नियतन देण्यात आले आहे.

पुणे शहरात शिक्षण हक्क (आरटीई) कायदाअंतर्गत अपात्र विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याबाबत

(२१) ४४८६७ (१७-०९-२०२२). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात शिक्षण हक्क (आरटीई) कायदातंर्गत विद्यार्थी बनावट भाडेकराराने नामांकित शाळांमध्ये मोफत प्रवेश घेत असल्याचे माहे एप्रिल, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे ही, खरे आहे काय,

(२) असल्यास, राखीव प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांमधील विद्यार्थी बनावट लाभार्थ्यांमुळे योजनेच्या लाभापासून वंचित असल्याचे निदर्शनास आले आहे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणातील एका व्यक्तीने शाळेजवळील मालमत्तेचा २७ पालकांशी भाडेकरार दुय्यम निबंधक कार्यालयात केल्याचे निदर्शनास आले आहे, ही हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिपक केसरकर (२२-११-२०२२) :१), २) व ३) हे खरे नाही.
सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात आरटीई २५% प्रवेश प्रक्रियेंतर्गत पुणे जिल्ह्यात सद्यस्थितीत १३,४६६ विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन लॉटरी पद्धतीने पूर्ण झाली आहे. तथापि, सदर प्रवेश प्रक्रियेदरम्यान बनावट भाडेकरार सादर करून नामांकीत शाळेत मोफ़त प्रवेश घेत असल्याबाबतची कोणतीही तक्रार प्राप्त झाल्याचे आढळून आलेले नाही.
४) व ५) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्हयातील मौजे बहिरवली (ता. खेड) ते मौजे करंबवणे (ता. चिपळूण) खाडीपुलाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(२२) ४४८८० (२०-०९-२०२२). श्री.भास्कर जाधव (गुहागर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रत्नागिरी जिल्हयातील मौजे बहिरवली (ता. खेड) ते मौजे करंबवणे (ता. चिपळूण) यादरम्यान दोन तालुक्यांना जोडणाऱ्या व सन २०१७-२०१८ मध्ये मंजुरी मिळालेल्या खाडीपुलाचे काम पूर्णत्वास जाण्यासाठी आवश्यक त्या परवानग्या प्राप्त करून घेण्यासाठी खासगी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्याच्या कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निविदा प्रक्रिया पूर्ण होवून खासगी तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्यात आली आहे काय, आणि सदर सल्लागाराकडून आवश्यक त्या सर्व परवानग्या प्राप्त करून घेण्यात आल्या आहेत काय व त्यानुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (३१-१०-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) तज्ञ सल्लागाराची नेमणूक करण्याच्या कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन आवश्यक परवानग्या प्राप्त करण्याचे नियोजन आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मुंबई-गोवा महामार्गावरील पळस्पे ते इंदापूर मार्गाचे काम प्रलंबित असल्याबाबत

(२३) ४५०८७ (२०-०९-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव नाईक (कुडाळ), श्री.सुनिल राऊत (विक्रोळी) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-गोवा महामार्गावरील पळस्पे ते इंदापूर मार्गाच्या चौपदरीकरणाचे काम कोट्यावधी रुपये खर्च करुनही मागील १० वर्षापासून प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याचे काम प्रलंबित असल्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त महामार्गावरील रस्त्याचे काम सुरु करण्याच्या अनुषंगाने कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. रविंद्र चव्हाण (२५-११-२०२२) :(१) (२) (३) व (४)
मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ च्या पनवेल ते इंदापूर कि.मी. ०.०० ते कि.मी. ८४.०० या लांबीतील चौपदरीकरणाचे काम केंद्र शासनातर्फे भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीपथावर आहे.

सदर काम (Flexible Pavement) खाजगीकरणाअंतर्गत BOT तत्वावर मेसर्स सुप्रीम पनवेल इंदापूर टोलवेज प्रा. लि. या कंपनीस देण्यात आले होते. परंतु सवलत करारनाम्यानुसार विहित मुदतीमध्ये काम पूर्ण न करू शकल्यामुळे कलम ३७ अंतर्गत मेसर्स सुप्रीम पनवेल इंदापूर टोलवेज प्रा. लि. यांना दिनांक १७.११.२०२१ रोजी Terminate करण्यात आले आहे.

तसेच Concessionaire मेसर्स सुप्रीम पनवेल इंदापूर टोलवेज प्रा. लि. याने Termination Order ला दिल्ली उच्च न्यायालयात आव्हान केले असून सद्यस्थितीत हे प्रकरण लवादामध्ये न्यायप्रविष्ठ आहे.

दरवर्षी होणारा मुसळधार पाऊस लक्षात घेता पनवेल ते इंदापूर ८४ कि.मी. लांबीत काँक्रिटीकरण करण्याचे निश्चित करण्यात आले आहे व त्याअनुषंगाने कि.मी. ४२.३०० ते कि.मी. ८४.६०० (कासू ते इंदापूर) या लांबीतील काँक्रिटीकरण (Rigid Pavement) करण्याच्या निविदा मागविण्यात आल्या होत्या व हे काम मेसर्स कल्याण टोल इन्फ्राला मिळाले असून वर नमूद केल्याप्रमाणे सदर प्रकरण लवादामध्ये न्यायप्रविष्ठ असल्याने अद्यापपर्यंत या कामास Work Order देण्यात आलेली नाही.

तसेच कि.मी. ०.००० (पळस्पे) ते कि.मी. ४२.३०० (कासू) टप्प्यातही काँक्रिटीकरणाचे काम O & M कंत्राटदारामार्फत करण्यात येणार आहे.

मेसर्स कल्याण टोल इन्फ्रा यांना हे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याने Work Order देता न येऊ शकल्याने कि.मी. ०.००० (पळस्पे) ते कि.मी. ४२.३०० (कासू) देखभाल दुरुस्तीचे काम मेसर्स जे. एम. म्हात्रे इन्फ्रा लिमिटेड यांच्यामार्फत करण्यात येत आहे. तसेच कि.मी. ४२.३०० (कासू) ते कि.मी. ८४.६०० (इंदापूर) मेसर्स रामेश्वर कन्स्ट्रकशन यांच्यामार्फत करण्यात येत आहे.

पुणे जिल्ह्यात अंत्योदय लाभार्थींना पॅकिंग मध्ये साखर देण्याबाबत

(२४) ४५१३६ (२०-०९-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात रेशनिंगच्या अंत्योदय योजनेच्या लाभार्थींना पॅकिंग मध्ये साखर देण्याबाबतचा निर्णय शासनाच्यावतीने घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामागची सर्वसाधारण कारणे काय तसेच जिल्ह्यातील एकंदरीत किती दुकानांमधील किती लाभार्थींना या योजनेचा लाभ होणार आहे,

(३) असल्यास, या योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीस केव्हा सुरुवात होणार आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (२४-११-२०२२) : (१) व (२) होय साखर नियतनामध्ये अधिकाधिक पारदर्शकता व सुसूत्रता आणण्यासाठी तसेच नियतनामध्ये घट-तुट नसावी व खराब माल वितरीत केला जाऊ नये म्हणून अंत्योदय अन्न योजनेच्या लाभार्थ्यांना १ किलोच्या पॅकेटमध्ये साखर उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे शहर व ग्रामीण मध्ये एकूण १९४८ रास्तभाव दुकांनांमधील एकूण २१३९२६ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ होणार आहे.

(३) या निर्णयाची अंमलबजावणी माहे जानेवारी २०२२ पासून करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

पुणे शहराच्या सिंहगड रस्ता परिसरातील औषध दुकानांमध्ये शासकीय नियमांचे उल्लंघन होत असल्याबाबत

(२५) ४५१५९ (१७-०९-२०२२). श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **अन्न व औषध प्रशासन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहराच्या सिंहगड रस्त्यावरील नऱ्हे-धायरी आणि लगतच्या परिसरातील अनेक औषध दुकानांमध्ये शासकीय नियमांचे काटेकोरपणे पालन करण्यात येत नसल्याचे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच सह आयुक्त (औषधे), अन्न व औषध प्रशासन, पुणे कार्यालयाने माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान याबाबत चौकशी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर दुकानांमध्ये संबधित शासकीय नियमांचे काटेकोरपणे पालन न करणाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय राठोड (०४-११-२०२२) : (१) होय, अंशत: खरे आहे.
मार्च २०२२ व त्यादरम्यान ०२ किरकोळ औषध विक्रेत्यांकडून शासकिय नियमांचे काटेकोरपणे पालन केले जात नसल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) होय, चौकशी करण्यात आली आहे.
(३) मार्च २०२२ व त्यादरम्यान कालावधीत सिंहगड रस्त्यालगतच्या नऱ्हे धायरी परिसरातील ०२ किरकोळ औषध विक्रेत्यांवर कारवाई घेण्यात आली, ०१ विक्रेत्याचा परवाना निलंबित करण्यात आला आहे व १ विक्रेत्याचा परवाना रदद केला आहे.
(४) लागू नाही.

सिंधुदुर्ग जिल्हयातील खरेदी-विक्री संघाकडे भात विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून अद्यापर्यंत बोनसची रक्कम मिळाली नसल्याबाबत

(२६) ४५२०६ (२३-०९-२०२२). श्री.नितेश राणे (कणकवली) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील खरेदी-विक्री संघाकडे भात विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून अद्यापर्यंत बोनसची रक्कम मिळाली नसल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यावर्षी केंद्र शासनाच्या हमी भावानुसार प्रति क्विटंल १९४० रुपये याप्रमाणे भात खरेदी करण्यात आल आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गतवर्षी शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून ७०० रुपये क्विंटलप्रमाणे भात खरेदीची रक्कम अदा करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने चौकशीअंती शेतकऱ्यांना बोनसची रक्कम लवकरात लवकर अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (२१-१०-२०२२) :(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हमी भाव व्यतिरिक्त रु.७००/- प्रोत्साहनपर राशी अदा करण्यात आली.
(४) व (५) धानाकरिता प्रोत्साहनपर राशी (बोनस) अदा करण्यासंदर्भात निर्णय घेण्यासाठी मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली शासन निर्णय दि. २८ सप्टेंबर, २०२२ अन्वये मंत्रीमंडळ उपसमिती गठीत करण्यात आली आहे.

राज्यात सायबर विद्यापीठ स्थापन करण्याबाबत

(२७) ४५२७६ (१७-०९-२०२२). श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.चेतन तुपे (हडपसर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि सायबर सुरक्षेची आवश्यकता लक्षात घेता, देशातील पहिले सायबर विद्यापीठ राज्यात स्थापन करण्यात येणार असल्याचे मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी एका खाजगी कार्यक्रमात घोषित केले असल्याचे दिनांक २३ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री महोदयांनी, सूर्यदत्ता ग्रुप ऑफ इन्स्टिटयुट, पुणे येथील एका संवाद कार्यक्रमात "ऑनलाईन व एकत्रित शिक्षणाच्या संदर्भात सायबर सुरक्षा " या विषयावर विद्यार्थी, प्राध्यापक आणि पालक यांचेशी संवाद साधतांना सायबर विद्यापीठाच्या निर्मितीची घोषणा केल्याचे त्याचवेळी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विद्यापीठाद्वारे सायबर सुरक्षासंदर्भात अद्ययावत शिक्षण दिले जाणार असल्याने व राज्यातील विद्यार्थ्यांचा ऑफलाईन शिक्षणाकडे ओढा जास्त असल्याचे लक्षात घेवून सदर विद्यापीठ निर्मितीबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२०-१०-२०२२) : (१), (२) व (३)
डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, रायगड येथे "स्कूल ऑफ सायबर सिक्युरिटी" सूरू करण्याच्यादृष्टीने सर्व बाबींचा अभ्यास करण्यासाठी संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली कार्यगटाची स्थापना करण्यात आली असून सदरच्या कार्यगटाचा अहवाल संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांनी त्यांच्या दि. २६/८/२०२२ रोजीच्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे.
तसेच याअनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाने सदरच्या प्रस्तावित स्कूल ऑफ सायबर सिक्युरिटी करीता प्रकल्प अहवाल (DPR) तयार केला असून सद्य:स्थितीत याबाबतच्या काही मुद्दयांची स्पष्टता होत नसल्याकारणाने स्वयंस्पष्ट खुलाश्यासह प्रस्ताव शासनास फेरसादर करण्याबाबत संचालकांना दि.१३/९/२०२२ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे सिरसदेवी, (तालुका गेवराई, जिल्हा बीड) येथील रास्तभाव दुकान बाबत

(२८) ४५६०९ (२५-०९-२०२२). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गेवराई (जि.बीड) विधानसभा मतदार संघातील लाभार्थ्यांना प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत दिले जाणारे माहे मे, २०२२ महिन्याचे मोफत धान्य मिळाले नसल्याचे लाभार्थ्यांनी केलेल्या तक्रारीवरून निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने मौजे सिरसदेवी, तालुका गेवराई, येथील रास्तभाव दुकानात केलेल्या चौकशी दरम्यान अन्नधान्याचे नियमानुसार वितरण होत नसल्याबाबत लाभार्थ्यांकडून लेखी जबाब प्राप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार तहसिलदार, गेवराई यांच्याकडून संबंधित रास्तभाव दुकान निलंबित करण्याबाबतच्या प्रस्तावावर शासनाकडून कार्यवाही सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर कार्यवाही केव्हापर्यंत पुर्ण करण्यात येणार आहे,
(५) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (०१-११-२०२२) : (१) हे खरे नाही. प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेअंतर्गत माहे मे, २०२२ करिता वितरीत करावयाचे अन्नधान्य शासकीय धान्य गोदामात उशीराने प्राप्त झाल्याने सदर अन्नधान्याचे वितरण माहे जून, २०२२ मध्ये ई-पॉस मशिनद्वारे करण्यात आले आहे.
(२), (३) व (४) मौजे सिरसदेवी, तालुका गेवराई, येथील रास्तभाव दुकानदार यांच्याविरुद्ध प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने तहसिलदार, गेवराई यांनी चौकशी करुन सदर दुकान निलंबित करण्याचा प्रस्ताव जिल्हा पुरवठा अधिकारी, बीड यांना सादर केला होता. त्यानुसार संबंधित दुकानदार श्रीमती शोभा सुधाकर वक्ते यांच्या नावे असलेला परवाना जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालयाचे आदेश दि. १३.७.२०२२ अन्वये निलंबित करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

विद्यापीठांच्या परिक्षा पध्दतीत एकसमानता आणण्याबाबत

(२९) ४५६१९ (१७-०९-२०२२). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.वैभव नाईक (कुडाळ) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यापीठांच्या परिक्षा पध्दतीत एकसमानता असावी याबाबतचा निर्णय राज्य शासनाने घेऊनही विद्यापीठांनी त्याचे पालन केलेले नसल्याने विविध विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने याबाबतचा निर्णय राज्य शासनाने घ्यावा व त्याचे पालन विद्यापीठाने करावे असे निदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सर्व अकृषी विद्यापीठांसह इतर विद्यापीठांच्या कुलगुरुंसोबत मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांनी परिक्षांच्या योजनांसंदर्भात दिनांक २५ एप्रिल, २०२२ रोजी वा त्या सुमारास बैठक घेऊन त्यामध्ये विद्यापीठांच्या परिक्षांमध्ये एकसमानता असावी, विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी प्रवेश घेणे सोयीचे व्हावे याकरीता परिक्षांचे नियोजन करावे व निकाल वेळेत जाहिर करावेत असा निर्णय घेतला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठाने एकसमानता बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०२-१२-२०२२) :(१) व (२) होय, हे खरे आहे.

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयीन परीक्षेसंदर्भात मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे अध्यक्षतेखाली दि. २५.०४.२०२२ रोजी सर्व विद्यापीठांचे कुलगुरू यांचेसमवेत बैठकीत सर्व कुलगुरूंच्या सहमतीने राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे/ डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे या विद्यापीठातील परिक्षा पद्धतींमध्ये एकसमानता राखणे आवश्यक राहील, असा निर्णय घेण्यात आला होता.

राज्यात सर्व विद्यापीठामध्ये परिक्षा पद्धतीत एकसमानता नसल्याच्या कारणास्तव श्रीम. बालुशा संतोष भासल व इतर यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्रमांक ६३८५/२०२२ दाखल केलेली होती. दि. ३०.०५.२०२२ रोजी मा. न्यायालयाने सदर याचिका निकालात काढली आहे.

(३) मा. न्यायालयाच्या निर्देशांनुसार याचिकाकर्त्यांना त्यांच्या सूचना मांडण्यासाठी उच्च शिक्षण संचालनालयात दि. ०१.०६.२०२२ रोजी उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. याचिकाकर्त्यांनी उपस्थित केलेल्या बाबींच्या अनुषंगाने शासनाने शासन पत्र दि. २३.०६.२०२२ अन्वये सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंना परीक्षेसंदर्भात राज्यातील सर्व विद्यापीठांच्या कुलगुरूंनी एकत्रित चर्चा करून योग्य तो निर्णय घ्यावा, जेणेकरून सर्व विद्यापीठांची परीक्षा घेण्याची पद्धत एकसमान राहील असे कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

उमरखेड (जि.यवतमाळ) येथील पुसद रोडवरील लोणाडी नाल्याचे नविन पुलाच्या बांधकामाबाबत

(३०) ४५६४९ (२१-०९-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) येथील पुसद रोडवरील लोणाडी नाल्याचे केंद्रीय निधी मार्ग अंतर्गत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नविन पूलाचे काम सुरु असून जुन्या पूलामधील निघालेले लोखंडी स्क्रप परस्पर विकल्याप्रकरणी अधिक्षक अभियंता, यवतमाळ यांच्याकडे माहे एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास तक्रार करण्यात आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या तक्रारीनुसार स्थानिक पोलिस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (११-११-२०२२) : (१) होय, माहे मे, २०२२ मध्ये प्राप्त झाली आहे.
(२) होय, तक्रारीच्या अनुषंगाने उप विभागीय अभियंता यांच्याविरूध्द विभागीय चौकशी सुरू करण्यात आली असून त्यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच, संबंधित उप विभागीय अभियंता यांच्याविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करणेबाबत पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, उमरखेड यांना कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुसद यांचेमार्फत कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील अन्न सुरक्षा योजनेस गती देण्याबाबत

(३१) ४५७२८ (१७-०९-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यातील गोर-गरीब आणि गरजू लाभार्थी यांना स्वस्त धान्य अन्न सुरक्षा योजने अंतर्गत कोणताही लाभार्थी वंचित राहू नये यासाठी सदर मोहीम गतीमान करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी (मंगळवेढा) यांनी पुरवठा विभाग, मंगळवेढा यांना माहे, एप्रिल २०२२ मध्ये केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त मागणीनुसार अन्नसुरक्षा योजनेला गती देण्याबाबत शासन काय कार्यवाही करीत आहे वा करणार आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (३०-११-२०२२) :
१) व २) होय, हे खरे आहे. श्री. समाधान अवताडे, मा. विधानसभा सदस्य तथा अध्यक्ष, तालुकास्तरीय दक्षता समिती, मंगळवेढा यांनी तालुकास्तरीय दक्षता समितीच्या दि. १२.४.२०२२ च्या आढावा बैठकीमध्ये राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत इष्टांकाची मागणी करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानुसार मंगळवेढा तालुक्यातील अनुदानित अन्नधान्यापासून वंचित शिधापत्रिकाधारकांची माहिती सादर करण्याबाबत तहसीलदार, मंगळवेढा यांनी संबंधितांना सूचना दिल्या होत्या. त्यानुषंगाने मंगळवेढा तालुक्यातील दिव्यांग व इतर शिधापत्रिकाधारकांकडून प्राप्त झालेल्या अर्जांपैकी २११ पात्र शिधापत्रिकांवरील ६४८ सदस्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांच्या यादीत समाविष्ट करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रांमध्ये सुधारणा करणेबाबत

(३२) ४५७८३ (१७-०९-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रांमध्ये सुधारणा करण्यासाठी माहे डिसेंबर, २०२० मध्ये वा त्यादरम्यान सुधार समिती गठीत केल्याचे निदर्शनास आले,हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदरील समितीने शासनास अहवाल सादर केलेला आहे काय,
(३) असल्यास, सदरील अहवालात करण्यात आलेल्या शिफारशींबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१४-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) समितीच्या अहवालातील शिफारशीवरील कार्यवाही विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

मुक्ताईनगर (जि.जळगांव) येथील शासकीय स्वस्त धान्य दुकानांच्या प्राप्त तक्रारीबाबत

(३३) ४६०९९ (१७-०९-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगांव) येथील शासकीय स्वस्त धान्य दुकानांवर लाभार्थ्यांना निकृष्ट व सडलेली ज्वारी वाटप करण्यात आली असतांना देखील केवळ १२ टक्के ज्वारीचे प्रमाण खराब असल्याचा अहवाल जिल्हाधिका-यांना अमळनेर तहसिल कार्यालयातील पुरवठा निरिक्षक यांनी दिनांक १ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास सादर केला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर तालुक्यातील धान्य लाभार्थ्यांच्या आलेल्या असंख्य तक्रारीसंदर्भात दिनांक २९ एप्रिल, २०२२ रोजी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत तहसिलदारांच्या दालनात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी बैठकीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (१६-११-२०२२) : (१) मुक्ताईनगर, जि. जळगाव येथील शासकीय गोदामात ठेवण्यात आलेली ज्वारी किड लागलेली निकृष्ठ दर्जाची असल्याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सदर ज्वारीची तपासणी करण्यात आली. सदर तपासणीअंती साठवणूकीतील भरडधान्य खाण्यायोग्य असून त्यासाठी Cleaning & Upgradation करणे आवश्यक होते. सबब, सदर धान्यसाठ्याचे Cleaning & Upgradation करून तहसीलदार, मुक्ताईनगर यांनी काढलेल्या नियतनानुसार माहे मे, २०२२ करीता लाभार्थ्यांना ज्वारीचे वितरण करण्यात आले आहे. सदर ज्वारीबाबत कोणत्याही लाभार्थ्याकडून तक्रार प्राप्त झालेली दिसून येत नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या आदेशान्वये पुरवठा निरीक्षक अधिकारी, अमळनेर यांनी केलेल्या तपासणीअंती प्राप्त अहवालानुसार सदरचे भरडधान्य मानवी खाण्यायोग्य असल्याचा अहवाल सादर केला असल्यामुळे त्याचे Cleaning & Upgradation करून लाभार्थ्यांना त्याचे वाटप करण्यात आलेले आहे. सदर ज्वारीबाबत कोणत्याही लाभार्थ्याकडून तहसीलदार, मुक्ताईनगर यांच्याकडे तक्रार प्राप्त झालेली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

रत्नागिरी जिल्हयात आरटीई प्रवेशाच्या जागा रिक्त असल्याबाबत

(३४) ४६२९८ (१७-०९-२०२२). श्री.राजन साळवी (राजापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शिक्षण हक्क कायद्यांतर्गत (आरटीई) प्रवेशाच्या २८ हजार २५४ जागा अद्यापही रिक्त असल्याचे नुकतेच माहे मे,२०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रत्नागिरी जिल्हयातील १८१ जागांचा यामध्ये समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिपक केसरकर (२२-११-२०२२) :(१) हे खरे नाही.

तथापि, सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात आरटीई २५% प्रवेश प्रकियेंतर्गत ३०.७.२०२२ पर्यंत १,०१,९०६ जागांपैकी ७८,८११ जागांवर विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला असून उर्वरीत २३,०९५ जागा रिक्त आहेत.

(२) अंशतः खरे आहे.

(३) पसंतीची शाळा मिळालेली नसणे, अपूर्ण कागदपत्रे अशा कारणांमुळे जागा रिक्त राहत असल्याचे शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निदर्शनास आणले आहे.
(४) व (५) मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार वंचित व दुर्बल घटकातील बालके उपलब्ध न झाल्यास त्याप्रमाणात २५ टक्के प्रवेशातील जागा रिक्त ठेवणे बंधनकारक आहे. यामुळे सदर जागा, या जागा सर्वसाधारण गटातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्यावर्तीत/ वर्ग करता येणार नसल्याबाबतची तरतूद शासन निर्णय दिनांक १६.१.२०१८ अन्वये करण्यात आली आहे.

अमरावती जिल्हयात आरटीई प्रवेशाला प्रतिसाद नसल्याबाबत

(३५) ४६६७३ (१७-०९-२०२२). श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हयात शिक्षण हक्क कायद्यांतर्गत एकुण २ हजार २१३ पाल्यांना उक्त योजनेचा लाभ मिळाला होता परंतु उक्त लाभार्थ्यांपैकी केवळ १ हजार ४७९ विद्यार्थ्यांने प्रवेश घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ७१५ पालकांनी या प्रवेशाला कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे दिसून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेऊन दुसऱ्या टप्प्यात प्रतिक्षेत असलेल्या पाल्यांना संधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिपक केसरकर (२२-११-२०२२) :(१) हे खरे नाही.
अमरावती जिल्ह्यात आरटीई २५% प्रवेश प्रकियेंतर्गत सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षासाठी जाहीर झालेल्या २,२१३ विद्यार्थ्यांच्या निवड यादीतून एकूण २,००१ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे.
(२) हे खरे नाही.
चौथ्या व अंतिम फ़ेरीत केवळ २१२ पालकांनी प्रवेशाला प्रतिसाद दिला नसल्याचे आढळून आले आहे.
(३) आरटीई २५% प्रवेश प्रकियेंतर्गत सन २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात प्रतिक्षा यादीतील विद्यार्थ्यांना ४ फ़े-यांमध्ये संधी देऊन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

भोर (जि.पुणे) येथील मार्कंडेय हातमाग विणकर सहकारी संस्थेबाबत

(३६) ४७०७३ (२७-१०-२०२२). श्री.संग्राम थोपटे (भोर) : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भोर (जि.पुणे) येथील मार्कंडेय हातमाग विणकर सहकारी सुतगिरणी मर्यादित भोर या सुतगिरणीचा अवसायनाची कालानुक्रमानुसार संपूर्ण व अद्ययावत माहिती मागविण्यात यावी असे शासनाने दिनांक १९ फेब्रुवारी, २०२१ रोजी वा त्यासुमारास निर्देश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार सदर सुत गिरणीची मुद्देनिहाय अहवाल माहिती आयुक्त, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अहवालावर निर्णय घेवून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (०१-१२-२०२२) : (१) होय, हे खरे आहे .

मा . मंत्री (वस्त्रोद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दि .१९.०१.२०२१ रोजी पार पडलेल्या बैठकीत मार्कंडेय हातमाग विणकर सहकारी सुतगिरणी मर्या ., भोर, (ता . भोर, जि . पुणे) या सुतगिरीणी च्या अवसा यकाकडून या सूतगिरणीची कालानुक्रमानुसार (chronological) संपूर्ण व अद्ययावत माहिती मागविण्यात यावी अ सा निर्णय घेण्यात आला होता . सदर बैठकी तील निर्णयनुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्या साठी आयुक्त , वस्त्रोद्योग, नागपूर यांना दि . १२ फेब्रुवारी , २०२१ रोजी च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते .

(२) या सूतगिरणीचे अवसायक यांनी दि .०४.०३.२०२१ च्या पत्रान्वये या सुतगिरणीची मुद्देनिहाय माहिती आयुक्त , वस्त्रोद्योग , नागपूर यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली होती .

(३) व (४) आयुक्त , वस्त्रोद्योग , नागपूर यांनी या सुतगिरणीची मुद्देनिहाय माहिती दि .२९.०४.२०२१ च्या पत्रान्वये शासनास सादर केली होती. तथापि , आयुक्त , वस्त्रोद्योग , नागपूर यांनी सादर केलेली माहिती सूतगिरणीच्या कालानुक्रमानुसार (chronological) नसल्याने या सूतगिरणीची नोंदणी झाल्यापासून आतापर्यंत झालेल्या सर्व घटनांची संपूर्ण व अद्यावत माहिती कालानुक्रमानुसार (chronological) तात्काळ शासनास उपलब्ध करुन देण्याची विनंती आयुक्त , वस्त्रोद्योग , नागपूर यांना करण्यात आली आहे . सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल .

राज्यातील विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वैयक्तिक कृती शिक्षणाचा आराखडा तयार करण्याबाबत

(३७) ४७२०७ (१७-०९-२०२२). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.विश्वनाथ भोईर (कल्याण पश्चिम), श्री.उदयसिंग राजपुत (कन्नड), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार राज्यातील विद्यापीठांतर्गत पदवी अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वैयक्तिक कृती शिक्षणाचा आराखडा तयार करण्यासाठी व तीन वर्षाचा पदवी अभ्यासक्रम चार वर्षाचा करण्यासाठी शासनातर्फे तज्ञांची समिती नियुक्ती करण्यात येऊन सदरहू समितीस तीन महिन्यात अहवाल सादर करण्याचे आदेश शासनाने माहे एप्रिल, २०२२ रोजी वा त्या सुमारास दिले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीने आपला अहवाल सादर केला आहे काय,

(३) असल्यास, अहवालातील शिफारशींवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (२१-११-२०२२) : (१) (२) व (३) हे खरे आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० ची राज्यात अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सध्या सुरू असलेल्या ३ वर्षाच्या अभ्यासक्रमावरुन ४ वर्षाच्या अभ्यासक्रमाकडे स्थलांतर करण्यासाठी योजना व त्याबाबतचा आराखडा तयार करणे, एकसमान शैक्षणिक अभ्यासक्रम आराखडा तयार करणे, सामान्य अध्यापनशास्त्राऐवजी विधायक अध्यापनशास्त्राचा वापर करणे, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वैयक्तिकृत शिक्षणाचा आराखडा तयार करणे यासंदर्भात शासनाने शासन निर्णय, दि. २६.०४.२०२२ तसेच शासन पुरक पत्र दि. ०१.०६.२०२२ अन्वये डॉ. रविंद्र कुलकर्णी, प्र-कुलगरु, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली होती. सदर समितीने आपला अहवाल माहे, ऑक्टोबर, २०२२ मध्ये शासनास सादर केला असून सदर अहवालातील समितीच्या शिफारशी शासनाने स्विकारल्या आहेत. विद्यापीठांच्या विहित प्राधिकरणांची मान्यता घेऊन अहवालातील शिफारशीची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी निर्णय घेण्याबाबत राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे/ अभिमत विद्यापीठे/ समुह विद्यापीठे/ स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे यांना दि. ४ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात विशेषत: हिंगोली व परभणी जिल्हयात बनावट तसेच दुबार आधारकार्ड नोंदणी झाल्याबाबत

(३८) ४७३८५ (१७-०९-२०२२). श्री.तान्हाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.शिरीष चौधरी (रावेर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.राहूल पाटील (परभणी) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात १९ लाख विद्यार्थ्यांचे आधारकार्ड बोगस असून २९ लाख विद्यार्थ्यांची शाळांत विना आधारकार्ड नोंदणी करण्यात आली असल्याचे दिनांक २७/३/२०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली जिल्ह्यात सरल पोर्टल वर विद्यार्थ्यांची आधार नोंदणी ३१ मार्च पर्यंत पूर्ण करून घ्यावी असे शिक्षण संचालकांनी निर्देश दिले असतानाही २८३९ आधार क्रमांक दुबार असल्याचे आढळून आल्याने शेकडो शिक्षक अतिरिक्त ठरणार असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) तसेच परभणी जिल्ह्यात १७ हजार ८८७ विद्यार्थी दुबार असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार अतिरिक्त विद्यार्थी संख्या दाखवून चुकीची माहिती शासनास सादर करणाऱ्या शाळा व्यवस्थापनावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिपक केसरकर (२२-११-२०२२) :(१), (२) व (३) अंशतः खरे आहे.

(४) व (५) जिल्हा गटशिक्षणाधिकारी स्तरावरून देण्यात आलेल्या सूचनांच्या आधारे हिंगोली जिल्ह्यात ८,६८२ व परभणी जिल्ह्यातील १४,६९४ विद्यार्थ्यांपैकी अनुक्रमे ६,५३१ व १२,५२६ विद्यार्थ्यांची नोंद शाळेच्या लॉगिन मधून काढण्यात आली आहे. उर्वरीत विद्यार्थ्यांच्या आधारबाबत पडताळणी करून आवश्यक कार्यवाही शाळा स्तरावरून करण्यात येत आहे.

यवतमाळ जिल्हयात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत जून्या पूलामधील निघालेले लोखंडी स्क्रॅप निविदा प्रक्रिया न राबविता भंगारमध्ये विकल्याबाबत

(३९) ४७६६३ (२५-०९-२०२२). श्री.नामदेव ससाणे (उमरखेड) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत पुसद-उमरखेड रोडवर ४ जून्या पूलाचे नविन बांधकाम सुरु असून जून्या पूलामधील निघालेले लोखंडी स्क्रॅप नियमानुसार निविदा प्रक्रिया न राबविता भंगार मध्ये विकल्याची बाब माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी संपूर्ण पुराव्यानिशी अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच पोलीस स्थानकात तक्रार दाखल केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (११-११-२०२२) : (१) होय.

(२) व (३) होय, तक्रारीच्या अनुषंगाने उप विभागीय अभियंता यांच्याविरूध्द विभागीय चौकशी सुरू करण्यात आली असून त्यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच, संबंधित उप विभागीय अभियंता यांच्याविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही करणेबाबत पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, उमरखेड यांना कळविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

मिरज (जि.सांगली) तालुक्यातील आरटीई अंतर्गत प्रवेश देण्यासाठी विद्यार्थ्यांकडे शैक्षणिक शुल्काच्या नावाखाली फी सक्ती केल्याबाबत

(४०) ४७७२५ (१७-०९-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरज (जि.सांगली) तालुक्यातील आरटीई अंतर्गत प्रवेश देण्यासाठी विद्यार्थ्यांकडे शैक्षणिक शुल्काच्या नावाखाली फी सक्ती करीत असल्याची तक्रार माहे एप्रिल, २०२२ च्या सुमारास शिक्षणाधिकारी यांच्याकडे करण्यात आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिपक केसरकर (२२-११-२०२२) :(१) हे खरे आहे.
(२) व (३) आरटीई अंतर्गत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्काच्या नावाखाली कोणत्याही प्रकारची फ़ी वसूल करत असलेल्या विना-अनुदानित अथवा स्वयंअर्थसहाय्यित शाळांवर शासन परिपत्रक क्र. आरटीई-२०१३/प्र. क्र. ११४/प्राशि-१, दिनांक १८.४.२०१३ अन्वये कारवाई करण्यात येईल, अशा सूचना शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, सांगली यांनी दिनांक ११.४.२०२२ च्या पत्रान्वये दिल्या आहेत.

राज्यातील अनुदानित महाविद्यालयातील रिक्त पदे अनेक वर्षापासून भरण्याचे प्रलंबित असल्याबाबत

(४१) ४७७२७ (१७-०९-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अनुदानित महाविद्यालयातील रिक्त पदे अनेक वर्षापासून रखडली असून सदरच्या रिक्त जागा तातडीने भरण्याबाबतचे लेखी निवेदन मा. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री , महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ०५ मे, २०२२ रोजी वा त्या सुमारास दिले हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निवेदनानुसार रिक्त जागा भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (११-११-२०२२) :(१) हे खरे नाही.
(२) व (३) राज्यातील अकृषि विद्यापीठांशी संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील मोठ्या प्रमाणावर रिक्त असलेल्या शिक्षकीय पदांपैकी सहाय्यक प्राध्यापकांची ४० टक्के म्हणजेच ३५८० पदे भरण्यास उच्च स्तरिय सचिव समितीने मान्यता दिलेली आहे. यानुसार दि. ०३/११/२०१८ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून, त्यानुसार पदभरतीची प्रक्रीया सुरू होती. परंतु कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर पदभरतीवर निर्बंध जारी करण्यात आल्याने सदर पदभरतीची प्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. तथापि, आता वित्त विभागाच्या सहमतीने केवळ सहाय्यक प्राध्यापक या संवर्गातील पदभरतीची प्रक्रीया शासनाच्या दि. १२/११/२०२१ च्या आदेशानुसार पुन:श्च सुरू करण्यात आलेली आहे.

कल्याण-डोंबिवली (जि. ठाणे) येथील महापालिका हद्दीतील शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्याचा पुरवठा करण्याबाबत

(४२) ४७९३७ (१६-०९-२०२२). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कल्याण-डोंबिवली (जि. ठाणे) महानगरपालिका हद्दीतील शिधापत्रिकाधारकांना अन्न सुरक्षाअंतर्गत रेशन दुकानात पुरविण्यात येणाऱ्या धान्याचा पुरेशा प्रमाणात पुरवठा होत नसल्याने त्यांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०२२ वा त्या

दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय.
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (२५-११-२०२२) : (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

ग्रामीण भागातील मुलींच्या उपस्थिती भत्त्यामध्ये महागाई निर्देशांकाप्रमाणे वाढ करण्याबाबत

(४३) ४७९५५ (१७-०९-२०२२). श्री.विनोद निकोले (डहाणू), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.राजेश रघुनाथ पाटील (बोईसर), श्री.राजेश पाडवी (शहादा) : तारांकित प्रश्न क्रमांक ३८६१५ ला दिनांक ४ मार्च, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात: सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने मुलींच्या साक्षरतेचे प्रमाण वाढावे म्हणून सन १९९१-९२ या वर्षांपासून ग्रामीण भागातील दारिद्र्यरेषेखालील तसेच समाजातील दुर्बल घटकातील विद्यार्थिनींना नियमित शाळेत उपस्थित राहण्यासाठी प्रतिदिन मुलीमागे १ रु. प्रमाणे मुलींच्या पालकांना उपस्थिती भत्ता देण्याची योजना सुरू करण्यात आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन १९९२ ते २०२२ या ३० वर्षांच्या कालावधीत १ ली ते ४ मध्ये शाळेत जाणाऱ्या मुलींच्या उपस्थिती भत्त्यात वाढ झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदरहू राज्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थीनींना प्रवास करणे कठीण जात असल्याने त्यांचा सर्वागीण विकास होण्याच्या दृष्टीने तसेच वाढत्या महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थीनींना शिक्षण उपस्थिती भत्त्यात वाढ करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिपक केसरकर (२४-११-२०२२) :(१) व (२) हे खरे आहे.
(३) उपस्थिती भत्ता या योजनेनंतर म्हणजे १९९२ नंतर मुलींची उपस्थिती वाढविण्यासाठी केंद्र/राज्य पुरस्कृत विविध नवीन योजना उदा. मध्यान्ह भोजन योजना, मोफत पाठयपुस्तके योजना, मोफत गणवेष योजना, विविध शिष्यवृत्त्या, वाहतुक भत्ता, मुलींसाठी वस्तीगृह व आश्रम शाळा, कस्तुरबा गांधी विद्यालय, शौचालय/स्वच्छतागृहे अशा अधिक प्रभावी नवीन योजना सुरू करण्यात आल्या. तसेच मानव विकास मिशन मार्फत मुलींना मोफत सायकल वाटप योजना व मोफत ST प्रवास योजना राबविण्यात येते. मुलींना १२ वी पर्यंत मोफत शिक्षण योजनाही राबविण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात मराठी माध्यमातून शिक्षण घेणा-या उमेदवारांना नोकरीत सामावून घेण्यांबाबत

(४४) ४७९६३ (१७-०९-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात केवळ मराठी माध्यमातून शिक्षण घेत असलेल्या तसेच सीबीएसई किंवा आयसीएसई मंडळाच्या शाळांमधून शिक्षण घेत नसलेल्या मराठी उमेदवारांना नोकरीसाठी अपात्र ठरविण्याचे प्रकार वाढत असल्याचे दिनांक ३१ मार्च, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे उक्त प्रकरणावर वेळीच प्रतिबंध केला नाही तर राज्यात मराठी शाळांतील मुलांना रोजगार

नाकारण्याच्या घटना वाढत जाऊ शकतात, अशी भिती व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यामुळे शासनाने मराठी माध्यमातून शिकलेल्या पात्र आणि सक्षम उमेदवारांना नोकरी न नाकारता त्यांना नोकरीत सामावून घेण्यासाठी विशेष कायदा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दिपक केसरकर (२४-११-२०२२) :(१) व (२) हे खरे नाही.
शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडून पवित्र प्रणालीमार्फत शिक्षण सेवक पद भरती केली जाते. सदर पदांची भरती पवित्र प्रणालीद्वारे, शिक्षक अभियोग्यता चाचणी मधून निकष पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची नियुक्ती केली जाते.मराठी माध्यमातून शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना विभागामार्फत नोकरीमध्ये डावलले/अपात्र ठरविले जात नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

अंबरनाथ (जि.ठाणे) येथील शिधावाटप कार्यालय ४६ फ च्या अपुऱ्या जागेअभावी निर्माण होत असलेल्या समस्येबाबत

(४५) ४८०९१ (१९-०९-२०२२). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ (जि.ठाणे) येथील शिधावाटप कार्यालय ४६ फ च्या अपुऱ्या जागेअभावी निर्माण होत असलेल्या समस्येसंदर्भात दिनांक २२ फेबुवारी, २०२२ रोजी वा त्या सुतारास मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बैठकीच्या अनुषंगाने अंबरनाथ पंचायत समिती कार्यालयीन इमारतीच्या मोकळया जागेत शिधावाटप कार्यालय सुरु करणे तसेच सदर कार्यालयाकरिता पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याबाबतचे निर्देश मा.अन्न व नागरी पुरवठा मंत्री यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर निर्देशाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (२४-११-२०२२) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सदर निर्देशाच्या अनुषंगाने पंचायत समिती कार्यालयाच्या आवारातील मोकळया जागेची पाहणी केली असता सदर इमारत धोकादायक असल्याचे जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, अंबरनाथ यांनी दि.४.६.२०२१ रोजीच्या अहवालात नमूद केले आहे. शिधावाटप कार्यालय क्र.४६/फ, अंबरनाथ, (प.) करिता अन्य पर्यायी जागा भाडेतत्वावर घेण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) विलंबाचा प्रश्न उद्भवत नाही.

बल्लारपूर (जि.चंद्रपूर) तालुक्यातील शिधापत्रिकाधारकांना नियमित धान्य पुरवठा करुन नवीन शिधापत्रिकाधारकांसाठी धान्य कोटा मंजूर करण्याबाबत

(४६) ४८११३ (१९-०९-२०२२). श्री.सुभाष धोटे (राजूरा), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बल्लारपूर (जि.चंद्रपूर) तालुक्यात गत आठ महिन्यांपासून शिधापत्रिका धारकांना स्वस्त धान्य दुकानातुन मोफत धान्य नियमित मिळत नसल्याचे माहे जून, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच नवीन शिधापत्रिकाधारकांना दोन वर्षापासून धान्य मंजूर झाले नसल्यामुळे लाभार्थ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण

आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने शिधापत्रिकाधारकांना नियमित धान्य पुरवठा करुन नवीन शिधापत्रिका धारकांना तातडीने धान्य कोटा मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?.

श्री. रविंद्र चव्हाण (१४-११-२०२२) : (१) हे खरे नाही. चंद्रपूरसह संपूर्ण राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील पात्र लाभार्थ्यांना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत नियमित तसेच प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत मोफत अन्नधान्याचे वितरण सुरळीत सुरु आहे.
(२) व (३) राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत नवीन शिधापत्रिकाधारकांना समाविष्ट करुन घेण्याबाबत यापूर्वीच्या दि. १६.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या इष्टांकाची पूर्तता झाल्याने दि. १८.२.२०२२ च्या शासन निर्णयान्वये जिल्हानिहाय इष्टांकात सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार चंद्रपूर जिल्ह्याकरिता यापूर्वीच्या दि. १६.११.२०१८ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या इष्टांकात वाढ करण्यात आली आहे. सुधारित इष्टांकानुसार नवीन योग्य व गरजू लाभार्थी निवड करण्याची कार्यवाही सुरु आहे. कोणताही पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यात शिवभोजन केंद्रांची संख्या वाढविण्याबाबत

(४७) ४८३३५ (१९-०९-२०२२). श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **अन्न व नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शिव भोजन योजना ही गरीब व सर्वसामान्य नागरिकांसाठी राबविली जात असून या योजनेच्या केंद्रांची संख्या कमी असल्यामुळे गरीब व सर्वसामान्य नागरिकांना या योजनेचा लाभ मिळत नसल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठी राज्यात शिव भोजन योजनेच्या केंद्रांची संख्या वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (०३-११-२०२२) : (१) व (२)
शिवभोजन योजनेअंतर्गत मे, २०२२ पर्यंत एकूण १८७० शिवभोजन केंद्रांना मंजूरी देण्यात आली. त्यापैकी अकार्यान्वित असलेली शिवभोजन केंद्र दि.०१.०६.२०२२ पासून रद्द करण्यात आली आहे. शिवभोजन केंद्र यांची परिणामकारकता व जिल्हास्तरावरील सुधारणा याबाबत मा. पालकमंत्री स्तरावर प्रत्येक जिल्ह्यात आढावा घेण्याबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत. त्याचा अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज (जि.नागपूर) विद्यापीठाने कोरोना काळात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन न दिल्याबाबत

(४८) ४८३९२ (२०-०९-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाने कोरोना काळात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन न देणाऱ्या अभियांत्रिकी महाविद्यालयावर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठाने उक्त प्रकरणी नेमेलेल्या विशेष समितीचा अहवाल शासनास प्राप्त

झाला आहे काय;
(३) असल्यास, उक्त अहवालात कोणकोणत्या शिफारसी करण्यात आल्या आहेत तदनुषंगाने कोरोना काळात शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन न देणाऱ्या अभियांत्रिकी महाविद्यालयांबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. चंद्रकांत (दादा) पाटील (१६-११-२०२२) :(१) नाही. अशा तक्रारींची शहानिशा करून तात्काळ अहवाल सादर करण्यासाठी सत्यशोधन समिती गठित करण्याचा विद्यापीठाने निर्णय घेतला होता.
(२) सदर समितीने विद्यापीठास अहवाल सादर केला आहे.
(३) व (४) संबंधित अभियांत्रिकी महाविद्यालयांकडून थकित वेतन देण्यात आले असून कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

परभणी जिल्ह्यातील जिंतूर- परभणी या महामार्गाचे काम अपूर्ण व निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत

(४९) ४८७२६ (२३-०९-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील जिंतूर येथील महामार्गाच्या कामास मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे पाण्याअभावी काम संथगतीने सुरु असल्याचे माहे जून, २०२२ मध्ये निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, परभणी ते जिंतूर हा सदरहू नविन रा.म.क्र. ७५२ के या रस्त्याच्या रुंदीकरण व मजबुतीकरणच्या कामास मे.ऋत्वीक प्रोजेक्ट प्रा. लि. यांना दिनांक २० जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिलेल्या कार्यारंभ आदेशानुसार सदर काम प्रगतीपथावर असताना तेथील स्थानिक नागरीकांनी ब-याच वेळेस काम बंद केले आहे हे खरे आहे काय,
(३) असल्यास, तसेच रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडे तोडण्यासाठी परवनागीस झालेला विलंब व तेथील विदयुत /पाणीपुरवठा वाहिन्यांचे स्थलांतर तसेच ठेकेदारांच्या आर्थिक अडचणीमुळे सदर रस्त्याचे काम ४ महिने अपूर्णावस्थेत होते हे खरे आहे काय,
(४) असल्यास, परभणी या महामार्ग रस्त्यावरील वेळोवेळी खड्डे व भेगा भरुन रस्ता वाहतुकीस सुरळीत व सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टिने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत तसेच या महामार्गाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे होत असल्याने या रस्त्याचे तात्काळ ऑडिट करून क्वालिटी कंट्रोल मार्फत चौकशी करण्यात येणार आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन सदर रस्ता वाहतुकीस सुरळीत व सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (२२-११-२०२२) :(१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या). औरंगाबाद अंतर्गत विषयांकित जिंतूर ते परभणी नवीन राष्ट्रीय महामार्ग ७५२-के या रस्त्याच्या रुंदीकरणाचे व मजबुतीकरणाच्या कामासाठी कंत्राटदार मे.पी.एस.के.व ऋत्वीक प्रोजेक्ट लि.हैदराबाद (जे.व्ही.) यांना दिनांक २०.०९.२०१७ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे. जिंतूर-परभणी रस्त्याचे काम करीत असताना तेथील स्थानिक नागरीकांनी बऱ्याच वेळेस काम बंद केले होते. तसेच ठेकेदराची आर्थिक अडचण असल्यामुळे तेथील काम ४ महिने बंद होते. सदर महामार्गाचे काम स्थानिक नागरीक बंद करीत असल्यामुळे कंत्राटदाराकडून याबाबत वेळोवेळी जिल्हाधिकारी, पभरणी व पोलीस अधिक्षक, परभणी यांना कळविण्यात आलेले आहे.
(३) होय, हे खरे आहे.
जिंतूर ते परभणी विदयुत / पाणीपुरवठा वाहिन्यांचे स्थलांतर करीत असताना मौजे झरी, बोरी व टाकळी या गावातील अतिक्रमण हटविण्यास विरोध केला होता. जिल्हाधिकारी, परभणी यांनी पोलीस अधिक्षक, परभणी यांना पोलीस संरक्षण देण्याबाबत कळविले होते.त्यानुसार पोलीस बंदोबस्तात काम करण्यात आले. ठेकेदाराची आर्थिक अडचण असल्यामुळे

तेथील काम जानेवारी, २०१९ ते एप्रिल, २०१९ दरम्यान ४ महिने बंद होते.
(४) होय. सद्यस्थितीत रस्त्यावर खड्डे पडलेले नसून काही ठिकाणी भेगा दिसून येत आहे व त्याची दुरुस्ती प्रगतीपथावर आहे. रस्ता सुरक्षित ठेवण्याच्यादृष्टीने जिंतूर-परभणी रस्त्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी कडून तक्रारी येत असल्यामुळे या रस्त्यावर तात्काळ थर्ड पार्टी ऑडिट करण्याकरीता केंद्रिय सडक व परिवहन मंत्रालय यांनी Fortress Infracon Limited या कंपनीची नेमणूक केलेली आहे. त्यानुसार या रस्त्याचे ऑडिट त्यांच्याकडून करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.
रस्ता वाहतुकीस सुरळीत व सुरक्षित ठेवण्याच्यादृष्टीने EPC कंत्राटातील तरतुदीनुसार कंत्राटदारामार्फत योग्य त्या उपाययोजना करण्यात येत आहेत.

औसा विधानसभा मतदारसंघातील रस्त्यांच्या कामांना मंजूरी मिळण्याबाबत

(५०) ४९०२९ (२५-०९-२०२२). श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर) : सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा विधानसभा मतदारसंघातील (जि.लातूर) प्रमुख जिल्हा मार्ग व राज्यमार्ग रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे सदरील रस्त्यांची सुधारणा करण्यासाठी माहे मार्च, २०२२ च्या अर्थसंकल्पात सार्वजनिक बांधकाम मंडळ कार्यालय लातूर यांनी प्रस्ताव सादर केला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास सदरील कामे अर्थसंकल्पात मंजूर झाली नसल्याने विशेष दुरूस्ती कार्यक्रमाअंतर्गत कामांना मंजूरी देण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग लातूर व निलंगा यांनी प्रस्ताव शासनास सादर केला असून मंजूरी देण्याबाबत औसा विधानसभा स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. सार्वजनिक बांधकाम मंत्री महोदय यांच्याकडे माहे मार्च, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे हे खरे आहे काय.
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. रविंद्र चव्हाण (२५-११-२०२२) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) विशेष दुरूस्ती कार्यक्रमाअंतर्गत प्रस्तावित केलेली कामे निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

विधान भवन : **राजेन्द्र भागवत**
नागपूर. **प्रधान सचिव,**
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.